# सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था , विक्रमगड , जि.पालघर

यांचे कार्यालय

विजय मेडीकलच्यावर, वाडा रोड, विक्रमगड जि.पालघर, पिन - ४०१६०५

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (ब-१)(ड)अंतर्गत आदेश**

जा.क्र./सनिवि/ /कलम७७ (अ) (ब-१)(ड)/ / २८ /२०१७

दि. २२/०२/२०१७

**वाचावे** :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय व कलम ७७ अ मधील तरतुद.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४

ज्याअर्थी **कुंझे आदिवासी वि. का.सहकारी संस्था.मर्या. मु.पो. कुंझे ता.विक्रमगड, जि. पालघर** ( यापुढे संस्था असे वाचावे ) ,नोंदणी क्रमांक टिएनअे/जेएचआर/आरएसआर (एसआर)/५८७/९० दि. १७/९/१९९० ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अंतर्गत या कार्यालयात नोंदणीकृत सहकारी संस्था आहे., व ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येते आणि

ज्याअर्थी, या संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ( यापुढे कायदा असे वाचावे ), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ ( यापुढे नियम असे वाचावे ), या संस्थेचे नोंदणीकृत उपविधी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार संस्थेचे कामकाज चालविले जाणे आवश्यक आहे आणि.

ज्याअर्थी, सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत ०३/११/२०१६ रोजी संपलेली असल्याने व संस्थेस वारंवार कळवुनही संस्थेकडुन अद्याप अद्ययावत मतदार यादी या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली नाही,तसेच निवडणुक निधीचा भरणा करण्यात आलेला नाही,सबब संस्थेची निवडणुक प्रक्रिया अद्याप सुरू करता आलेली नाही.यामुळे संस्थेची नविन समिती गठीत होईपर्यंत दैनंदिन कामकाज करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे संपुर्ण कामकाज ठप्प झालेले आहे व व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे आणि,

त्याअर्थी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) मधील परंतुक (२) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याची आवश्यकता नाही अशी माझी खात्री झालेली आहे. यास्तव पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी अनिल देवकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड तालुका, विक्रमगड जि. पालघर, **कुंझे आदिवासी वि. का.सहकारी संस्था.मर्या. मु.पो. कुंझे ता.विक्रमगड, जि. पालघर** या संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक झालेने, संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी श्री.दिपक म.लाड (बँक निरीक्षक), दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे, शाखा .विक्रमगड, जि.पालघर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

नवनियूक्त प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा, मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा तात्काळ पदभार घेवुन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच त्यांनी पदभार घेतल्यापासून

(कृ. मा.प.)

Scanned by CamScanner

सहा महिन्यांत नवीन समितीची निवडणुक घेवुन नवीन समितीनें पदभार घेण्याचे दृष्टीने आवश्यक व्यवस्था करावी.

सदरचा आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१)(ड) अन्वये आज दि. २२/०२/२०१७ रोजी माझी स्वाक्षरी व शासन मुद्रेसह निर्गमित केला असे.

(अनिल देवकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था विक्रमगड
विक्रमगड ,जि. पालघर

ठिकाण :- विक्रमगड
दिनांक :- २२/०२/२०१७.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड, जि. पालघर

प्रति,

१).चेअरमन / सचिव , **कुंझे आदिवासी वि. का.सहकारी संस्था.मर्या. मु.पो. कुंझे ता.विक्रमगड, जि. पालघर**

१/- आपणास सुचित करण्यात येते कि, संस्थेच्या दप्तराचा, मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा ताबा नवनियूक्त प्राधिकृत अधिकारी यांचेकडे तात्काळ सुपुर्द करावा.

२). श्री.दिपक म.लाड (बँक निरीक्षक), दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे, शाखा .विक्रमगड, जि.पालघर तथा प्राधिकृत अधिकारी कुंझे आदिवासी वि. का.सहकारी संस्था.मर्या. मु.पो. कुंझे ता.विक्रमगड, जि. पालघर

३ ).शाखाधिकारी, दि ठाणे जिल्हा म. सह. बँक लि. ठाणे, शाखा .विक्रमगड, जि.पालघर यांना कळविण्यात येते की सदर संस्थेचे बँक खाते तात्काळ प्राधिकृत अधिकारी यांचे नावे करण्यात यावे.

प्रत माहिती करीता सविनय सादर

१. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पालघर,जि. पालघर

(अनिल देवकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था विक्रमगड
ता.विक्रमगड, जि.पालघर

Scanned by CamScanner